# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १६४५

विभाग :- मलनि:स्सारण
दिनांक :- २१/११/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए व सी कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी नादुरूस्त झालेली मलजल वाहिनी नव्याने अंथरणे तसेच चेंबर्सची उंची वाढविणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**अंदाजीत रक्कम :- रु.१७,७७,४३६/-**

**प्रस्तावाचा मजकूर** :- केंद्र शासन पुरस्कृत सॅटेलाईट सिटी योनजेअंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार पूर्व-पश्चिम भागात भुयारी गटार योजना राबविण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत ८२ कि.मी. संकलन प्रणाली असून विरार पश्चिम बोळींज येथे ३० द.ल.ली. क्षमतेचे मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्र उभारले आहे. सदर योजना सन २०१७ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत ३० द.ल.ली. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

विरार पुर्व व पश्चिम भागात अंथरलेल्या संकलन प्रणालीव्दारे संकलीत होणारे मलजल गुरूत्वमुख्य वाहिनीव्दारे बोळींज मलनि:स्सारण केंद्र येथे येत आहे. भुमीगत अंथरलेल्या संकलन प्रणालीची देखभाल दुरूस्ती विभागामार्फत करण्यात येते.

१) प्रभाग समिती 'बी' विरार पूर्व येथे कारगील नगर परिसरातील शुभम कॉम्पलेक्स येथे अंथरण्यात आलेली मलजल वाहिनी वारंवार चोकअप होत आहे. परिणामी मलजल चेंबर मधुन बाहेर येत असल्याने सदर परिसरात दुर्गंधी पसरत असून तेथील नागरीकांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

२) विरार पूर्व भागातील फुलपाडा रोड, आईस फॅक्टरीच्या मागे ५० वर्षापासून कै. अण्णासाहेब वर्तक हरिजन वसाहत आहे. सदर घरांतील सांडपाणी सद्या वसाहतीलगत असलेल्या नाल्यात सोडले जाते. मात्र पावसाळ्यात सदर नाला तुडूंब भरल्याने न्हाणीघरातील सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपमधुन पावसाळी पाणी उलटून घरात येते. त्यामुळे हरिजन वसाहती मधील सांडपाणी वाहून नेण्याकरिता मलजलवाहिनी मुख्य मलजलवाहिनीशी जोडणी करून मिळणेबाबत तेथील रहिवाशांनी दि.९/०३/२०२४ रोजीच्या पत्राने विनंती केली आहे. तसेच प्रभाग समिती "सी" बांधकाम विभागामार्फत देखील हरिजन वसाहतीजवळ चेंबर्स बांधून मिळणेबाबत दि.१०/०३/२०२५ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे.

३) विरार पश्चिम भागातील सुमन कॉम्पलेक्स आणि वाय.के.नगर परिसरात रस्त्यांच्या कडेला तसेच काही ठिकाणी मध्यभागी मुख्यमलजलवाहिनी भूमीगत अंथरली असून सदर भागातील रस्त्यांची उंची वाढविण्याचे काम महापालिकेच्या बांधकाम विभागामार्फत होत आहे. याकामांमुळे वाय.के.नगर परिसरातील मॅनहोल रस्त्यांच्या लेअर्सखाली बुजले गेले असल्याची बाब निदर्शनास आली आहे. परिणामी नागरिकांच्या सांडपाणी निचरा विषयी प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करणे अडचणीचे होत आहे.

४) सद्य:स्थितीत विरार पूर्व, वरदविनायक लेन येथे अंथरण्यात आलेली मलजलवाहिनी ही शिवछाया अपार्टमेंटच्या अस्तित्वातील बोअरवेल नजीक भुमीगत अंथरण्यात आली आहे. सदर खाजगी बोअरवेच्या पाण्याचा वापर नागरीक करीत आहेत. सदर ठिकाणी भूमीगत अंथरलेल्या

मलजलवाहिनीची नासधुस घुशींमार्फत होत असल्याने मलवाहिनीस वारंवार गळती लागत आहे. परिणामी सदर मलवाहिनीव्दारे गळती होणाऱ्या पाण्यामुळे बोअरवेलचे पाणी दुषीत होत असल्याची तक्रार इमारतीतील रहिवाशी यांनी केली आहे. नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर ठिकाणी अंथरण्यात आलेली मलजलवाहिनी शिफ्टींग करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे ठिकाण | अंदाजीत लांबी / चेंबर्सची संख्या | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विरार (पू.), कारगील नगर, शुभम कॉम्पलेक्स ते मुख्य मलवाहिनीपर्यंत | ७० मीटर ३ चेंबर्स | रु.४,७७,७६२/- |
| २ | विरार (पू.), फुलपाडा रोड, आईस फॅक्टरीच्या मागे, हरिजन वसाहत | ५० मीटर व ४ चेंबर्स | रु.४,८४,०९४/- |
| ३ | सुमन कॉम्पलेक्स मधील तसेच वाय.के.न गर परिसर | ४७ चेंबर्स | रु.४,८३,०२६/- |
| ४ | विरार पूर्व, वरदविनायक लेन | ३० मीटर २ चेंबर्स | रु. ३,३२,५५४/- |
| | | **एकूण** | **रु.१७,७७,४३६/-** |

उपरोक्त प्रमाणे विरार पूर्व व पश्चिम येथील विविध ठिकाणी नादुरूस्त झालेली मलजलवाहिनी नव्याने अंथरणे तसेच चेंबर्सची उंची वाढविणे कामी महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभागाकडील सन २०२२-२३ च्या राज्य दरसूचीवर आधारीत एकूण रु.१७,७७,४३६/- किंमतीची अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत.

मा. आयुक्त यांचे जा.क्र.वविशम /लेखा / ७७/२०२५-२६ दि.०४/०८/२०२५ च्या आदेशानुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यतेचे अधिकार अतिरिक्त आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार सदरचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "मलनि:स्सारण केंद्र देखभाल दुरुस्ती खर्च व इतर" या लेखाशिर्षावरून भागविणे शक्य असून विषयांकीत कामी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर B/1 प्रकारची ई निविदा मागविण्यात येईल.

तरी - वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ए" व "सी" कार्यक्षेत्रातील वरील प्रस्तावात नमुद चार ठिकाणी नादुरूस्त झालेली मलजल वाहिनी नव्याने अंथरणे तसेच चेंबर्सची उंची वाढविणे कामी येणाऱ्या रु.१७,७७,४३६/- खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ६३ (३) नुसार प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

---

**प्रस्तावास मंजूरी :-**

अस्तित्वातील मलजलवाहिन्या नादुरूस्त होऊन सांडपाणी रस्त्यावर पसरत असल्याने नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने वरील प्रस्तावात नमुद चार कामे करणे आवश्यक आहे. करिता विभागाने उक्त चार कामांसाठी एकूण रु.१७,७७,४३६/- किंमतीची अंदाजपत्रके तयार केली असून सदर अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी B/१ प्रकारची ई-निविदा ७ दिवसांची सुचना प्रसिध्द करून मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

संजय हेरवाडे
अतिरिक्त आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका